# <u>गुरूमूर्ती</u>

गुरू महाराज गुरू
गुरूच ना कल्पतरू
कृपेने त्यांच्याच तरु
भवसागर तेच तारू ॥१॥

पिता तेच तेच माऊली
मायेची धरती साऊली
ज्ञानाची देऊन दिवटी
झोत मोक्षपथी टाकती ॥२॥

दीपस्तंभ इहलोकी
प्रेम मेरू परलोकी
भक्ती मेघ तीही लोकी
करुणार्णव गुरुमूर्ती ॥३॥

– नारायण
गुरू पौर्णिमा, शके १९४५
(०७/०३/२३)